

# मेट्रो ३ : पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो-३ मार्गिकेची निर्मिती करणाऱ्या एमएमआरसीचा पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष सज्ज झाला आहे. एकूण ४२८ जलशोषण पंप आणि १५ तत्काळ सेवा वाहन यांचे आयोजन करण्यात आले आहे. हा पावसाळी आपत्ती नियंत्रण कक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका, तसेच अग्निशमन दल व अन्य संस्थांशी जोडण्यात आला आहे. तर आपत्ती नियंत्रण कक्ष संपर्क कक्षासाठी ९१३६८०५०६५ आणि ७५०६७०६४७७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.